नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे स्थलांतरित कराव्या लागणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या बाबतीत विहित कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरपीए २०१४/प्र.क्र.५२/र-३

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२.०७.२०१९

संदर्भ:-

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांकः सीआयडी-१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१०, दिनांक १ मार्च, २०१४
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांकः सीआयडी-१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१०, दिनांक २८ मे, २०१४
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः एलक्युएन-०५/२०१४/प्र.क्र.३९/अ-२, दिनांक १६ जून, २०१४
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः आरपीए-२०१४/प्र.क्र.५२/र-३, दिनांक २५ जून, २०१४

प्रस्तावना:-

The Right to Fair Compensation and Transparency in land Acquisition Rehabilitation and Resettlement Act -२०१३ मधील तरतुदी विचारात घेवून, नगरविकास विभागाने संदर्भीय शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०१४ व दिनांक २८ मे, २०१४ अन्वये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमीनीच्या भूधारकांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच सदर प्रकल्पामुळे स्थलांतरीत होणाऱ्या सर्व अनधिकृत बांधकामधारकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्यासाठी धोरण जाहीर केले आहे. त्या अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णय दिनांक २५ जून २०१४ अन्वये देय भूखंड व इतर लाभ देण्याबाबतची कार्यप्रणाली विहीत करण्यात आलेली आहे. सदर विहित कार्यप्रणालीनुसार प्रकल्पबाधितांना आदेश व वाटपपत्रे स्विकारणे, वाटप केलेल्या भूखंडाचे भाडेपट्टा करारनामे करणे, इतर लाभांच्या रकमांचे धनादेश स्विकारणे इत्यादी बाबतीत जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग यांचे कार्यालय, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) अलिबाग, तसेच सिडको कार्यालय, सीबीडी बेलापूर अशा विविध ठिकाणी जावे लागत असल्याने बांधकामे निष्काशित होऊन बांधकामाखालील जमीन मोकळी होण्यास विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

विमानतळ प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्रकल्पबाधित होणाऱ्या गावांतील बांधकामे शिघ्र गतीने निष्काशित होण्यासाठी पुनर्वसन व पुनर्स्थापना योजने अंतर्गत भूखंड व इतर लाभ वितरीत करण्याच्या कार्यवाहीमध्ये सूसुत्रता व शिघ्रता आणण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भातील कार्यप्रणाली विषयक शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती,

शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे स्थलांतरित कराव्या लागणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व पुन:स्थापनेच्या बाबतीत विहित केलेल्या कार्यप्रणालीमध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) जिल्हाधिकारी रायगड यांनी अंतिमत: मंजूरी दिलेल्या पात्रतेप्रमाणे, प्रकल्पबाधित बांधकामधारकांना पुनर्स्थापनेसाठी देण्यात येणाऱ्या भूखंडाबद्दल व इतर लाभांबद्दल आदेश पारीत करणे, भूखंड वाटप करणे व इतर लाभांच्या रकमा अदा करणे इत्यादी कार्यवाही या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सिडकोमार्फत करण्यात येईल.

२) शासन निर्णय दिनांक २८ मे २०१४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषामध्ये प्रकल्प कार्यान्वित करण्यास प्रकल्पग्रस्तांसाठी काही निर्णय सिडकोने घेणे आवश्यक असल्यास, सदर बाबतीत पात्रता निश्चित करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना राहतील व सुधारीत पात्रतेनुसार देय लाभ व भूखंडाचे वाटप सिडकोमार्फत करण्यात येईल.

३) सिडकोच्या ताब्यातील जमीनीवरील जिल्हाधिकारी रायगड, यांनी पात्रता निश्चित केलेल्या बांधकामा व्यतिरिक्त अन्य बांधकामे विमानतळ प्रकल्पासाठी स्थलांतरीत करणे आवश्यक झाल्यास, अशा बांधकामांबद्दल द्यावयाची पात्रता व्यवस्थापकीय संचालक सिडको यांचे स्तरावर निश्चित करुन त्यानुसार भूखंड व इतर लाभाचे वाटप सिडकोमार्फत करण्यात येईल, तथापि असे करतांना कोणत्याही परिस्थितीत दिनांक २८ मे २०१४ च्या शासन निर्णयानुसार देय केलेल्या लाभापेक्षा कमी लाभ देता येणार नाहीत.

भूखंड व इतर लाभ देण्याची कार्यवाही यापुढे सिडकोमार्फत करण्यात येणार असल्याने जिल्हाधिकारी रायगड यांनी प्रकल्पबाधित बांधकाम धारकांना पुनर्वसनाचे लाभ अदा करण्यासाठी सिडकोने दिलेल्या आगाऊ रकमेतून वाटप केलेल्या रकमांचा ताळमेळ घेऊन उर्वरित रक्कम सिडकोस परत करावी तसेच उर्वरित वाटपपत्रे सिडकोकडे तात्काळ सुपूर्द करण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२११३७५८५८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prasannakumar Sadananda Thakur

Digitally signed by Prasannakumar Sadananda Thakur
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26565a6d8174436db1bdfcb621149f27a964fce785ca930cb445005a14b2f34d, cn=Prasannakumar Sadananda Thakur
Date: 2019.07.22 11:49:03 +05'30'

(प्र. स. ठाकूर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, मदत व पुनर्वसन, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

५. मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय , मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई.
१२. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), नरिमन पॉईन्ट, मुंबई.
१३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
१४. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका.
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६. जिल्हाधिकारी रायगड.
१७. जिल्हाधिकारी ठाणे.
१८. निवडनस्ती (कार्यासन र-३).